## आजचे पंचांग

सोमवार दि. ४ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत *२०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, तृतीया मंगळवारच्या पहाटे ५-२५ पर्यंत नंतर चतुर्थी तिथी, दिवस नक्षत्र–अनुराधा सकाळी ९-५८ पर्यंत
चंद्र रास - वृश्चिक, सूर्य रास - मेष,
गुरु रास - मिथुन



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## प्रवीणा देशपांडे यांचे निधन

**मुंबई**: मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री प्रवीणा देशपांडे (६०) यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली असून चाहत्यांसह सहकाऱ्यांनाही मोठा धक्का बसला आहे. मराठी आणि हिंदी चित्रपट तसेच टीव्ही मालिकांमधील त्यांच्या लक्षवेधी भूमिकांमुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनात वेगळं स्थान निर्माण केलं होतं. 'तस्करी' या वेब सिरीजमध्ये त्या झळकल्या होत्या. काही वर्षांपूर्वी त्यांना रक्ताच्या कर्करोगाचे निदान झाले होते.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ०४ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २१८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### महाराष्ट्र ऑलिंपिक असो.च्या अध्यक्षपदी मुरलीधर मोहोळ

**पुणे** : महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदावर अखेर केंद्रीय नागरी विमानवाहू राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पुण्याच्या बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या जाण्यानंतर हे पद काही काळ रिक्त होते.

### खारेगाव टोलनाका पुन्हा सुरू होणार?

**मुंबई :** मुंबई-नाशिक महामार्गावरील खारेगाव टोलनाका तब्बल ९ वर्षांनंतर पुन्हा सुरू करण्याची तयारी सुरू झाली आहे. २०१७ साली बंद करण्यात आलेला हा टोलनाका आता नव्या रस्ते प्रकल्पामुळे पुन्हा उभारला जात आहे. समृद्धी महामार्गाशी जोडणाऱ्या आमने ते ठाणे या दहा पदरी मार्गिकेच्या कामामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे मुंबईकडे जाणारा प्रवास वेगवान होणार असला तरी ठाणे, कल्याण, भिवंडी, नवी मुंबई आणि मुंबईकडे येणाऱ्या वाहनचालकांना पुन्हा टोलचा आर्थिक भार सहन करावा लागणार आहे.

### प्रचंड गदारोळानंतर बालहक्क आयोगाला जाग

**पुणे :** चिमुकलीवर झालेल्या अमानवीय अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या घटनेचा संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र निषेध व्यक्त केला जात आहे. आता अखेर महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाला जाग आली असून, आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय पुराणिक यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी ठोस पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.

### संतप्त जनतेचा रोष कायम; संपूर्ण राज्यात पडसाद

# नसरापूर प्रकरणी एसआयटी स्थापन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : नसरापूर येथील चार वर्षांच्या चिमुरडीवरील अत्याचार आणि हत्येच्या अमानुष घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. या प्रकरणाचा तपास जलद आणि सखोल पद्धतीने व्हावा यासाठी राज्य सरकारने विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. या निर्णयामुळे तपासाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या एसआयटी मध्ये सहा अनुभवी पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला असून त्यापैकी दोन महिला अधिकारी आहेत. पुणे ग्रामीण पोलिसांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक काम करणार आहे. पुरावे संकलन, साक्षीदारांचे जबाब आणि तांत्रिक तपास यावर विशेष भर दिला जाणार आहे.

घटनेनंतर नसरापूरसह संपूर्ण पुणे जिल्ह्यात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. नागरिकांनी पुण्यातील नवले पूल परिसरात आंदोलन करत आरोपीला तात्काळ फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली. वाढत्या लोकभावनेची दखल घेत प्रशासनाने तपास जलदगतीने पूर्ण करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

१ मे रोजी नसरापूर येथे ही धक्कादायक घटना घडली. घरासमोर खेळत असलेल्या चिमुकलीला ६५ वर्षीय आरोपीने फूस लावून गोठ्यात नेले. तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या करण्यात आली. त्यानंतर पुरावा लपवण्यासाठी मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली दडवण्यात आला. चिमुकली बराच वेळ दिसत नसल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला असता ती गोठ्यात मृतावस्थेत आढळली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर आरोपी मुलीला घेऊन जाताना दिसून आला आणि गुन्ह्याचा उलगडा झाला.

ग्रामस्थांनी आरोपीला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. मात्र एवढे गंभीर कृत्य करूनही त्याने पश्चाताप न दर्शवता न्यायालयात "ही किरकोळ मारामारीची केस आहे" असे धक्कादायक वक्तव्य केल्याची माहिती समोर आली आहे. न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तपासात हा आरोपी यापूर्वीही अशाच प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये संशयित असल्याचे समोर आले आहे. पुराव्याअभावी तो यापूर्वी सुटला होता, अशी माहिती पोलिसांकडून मिळत आहे.

चिमुकलीवर अंत्यसंस्कार केल्यानंतर तिच्या वडिलांनी भावनिक प्रतिक्रिया देताना, "मुलीला न्याय मिळेपर्यंत कुठलेही नेते भेटायला येऊ नयेत," अशी भूमिका घेतली आहे. काही जण या प्रकरणाचे राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

नसरापूरमधील ही घटना समाजाला हादरवून टाकणारी ठरली असून, आता सर्वांचे लक्ष एसआयटीच्या तपासाकडे लागले आहे. आरोपीला कठोर शिक्षा होऊन पीडितेला न्याय मिळावा, हीच सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# "त्या नराधमाला जिवंत राहण्याचा अधिकार नाही"

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : भोर तालुक्यातील नसरापूर येथे चार वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या केल्याच्या अमानुष घटनेने संपूर्ण राज्य हादरले आहे. या घटनेविरोधात तीव्र संताप व्यक्त होत असून आरोपीला तातडीने कठोर शिक्षा देण्याची मागणी जोर धरत आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पीडित मुलीच्या वडिलांशी दूरध्वनीवरून संवाद साधत त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी संतप्त प्रतिक्रिया देत, "त्या नराधमाला जिवंत राहण्याचा अधिकार नाही. त्याला फासावर लटकवल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही," असे ठाम शब्दांत सांगितले. त्याचवेळी शिंदे यांनी कुटुंबाच्या दुःखाबद्दल हळहळ व्यक्त करत, "तुमच्या पोटचा गोळा गेला आहे, आम्ही तुम्हाला कसे समजावू हेच कळत नाही," अशी भावनिक प्रतिक्रिया दिली.

या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली असून न्यायालयाने त्याला ७ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपीविरुद्ध खून, बलात्कार आणि पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या घटनेची दखल घेत, हा खटला जलदगती न्यायालयात चालवून आरोपीला कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट केले.

दरम्यान, या घटनेनंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. पुणे शहर आणि ग्रामीण भागात नागरिकांनी आंदोलन करत आरोपीला तातडीने फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. हा निव्वळ गुन्हा नसून समाजाला हादरवणारी शोकांतिका ठरली आहे.

# इराककडून सीरियाला तेलपुरवठा पुन्हा सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बगदाद** : इराकने सीरियातील अल-यारूबियाह सीमापार मार्गाद्वारे तेल निर्यात पुन्हा सुरू केली आहे. सुमारे ७० टँकरांचा ताफा या मार्गाने सीरियात दाखल झाला असून, मागील १४ वर्षांतील हा पहिलाच असा पुरवठा ठरला आहे. सीरियाच्या सरकारी वृत्तसंस्थेनुसार हा ताफा भूमध्य समुद्रकिनाऱ्यावरील बानियास रिफायनरीकडे रवाना झाला आहे.

सीमेवरील अधिकाऱ्यांनी सांगितले की, "१४ वर्षांनंतर हा मार्ग पुन्हा सुरू होणे हे इराक आणि सीरिया यांच्यातील आर्थिक संबंध मजबूत करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे." या निर्णयामुळे व्यापार आणि ऊर्जा पुरवठा अधिक सुलभ होणार असून दोन्ही देशांमध्ये दीर्घकालीन सहकार्याला चालना मिळणार आहे. हा निर्णय अशा वेळी घेण्यात आला आहे, जेव्हा होर्मुझ सामुद्रधुनी परिसरात अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील तणावामुळे अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे इराक पर्यायी मार्गांद्वारे तेल निर्यात वाढवण्याच्या प्रयत्नात आहे.

अल-यारूबियाह हा सीमापार मार्ग २०११ मध्ये सीरियन गृहयुद्ध सुरू झाल्यानंतर बंद करण्यात आला होता. त्यानंतर २०१४ मध्ये या भागावर आयएसआयएलचा ताबा गेला होता, मात्र पुढे इराकी कुर्द दलांनी हा परिसर पुन्हा ताब्यात घेतला. सीरिया पेट्रोलियम कंपनीने रिफायनरीची कार्यक्षमता वाढवल्याचा दावा केला आहे.

### पाच राज्यांच्या मतमोजणीकडे संपूर्ण देशाचे लक्ष

# मिनी लोकसभा निवडणुकीचे आज निकाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**नवी दिल्ली** : पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पुद्दुचेरी या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल सोमवारी जाहीर होणार असून सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार आहे. एप्रिल महिन्यात पार पडलेल्या या निवडणुकांमध्ये सर्वच राज्यांत चुरशीची लढत पाहायला मिळाली असून आता संपूर्ण देशाचे लक्ष निकालांकडे लागले आहे. दुपारी १२ वाजेपर्यंत बहुतांश राज्यांचे कल स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

या निकालांचा परिणाम केवळ राज्यांच्या सत्तासमीकरणांवरच नव्हे, तर आगामी राष्ट्रीय राजकारणावरही होणार असल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेससमोर भाजपचे कडवे आव्हान आहे. २०२१ मध्ये टीएमसीने २१५ जागा जिंकून सत्ता राखली होती, तर भाजप ७७ जागांवर थांबला होता. यंदा ही लढत अधिक चुरशीची मानली जात असून "दीदींची हॅट्रिक की भाजपचा शिरकाव" हा मुख्य प्रश्न ठरणार आहे.

तामिळनाडूत मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील डीएमके पुन्हा सत्तेत येण्यासाठी प्रयत्नशील आहे. एआयएडीएमकेनेही जोरदार आव्हान उभे केले आहे. २०२१ मध्ये डीएमकेने १३३ जागा जिंकून सत्ता मिळवली होती.

केरळमध्ये मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या एलडीएफ सरकारला काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूडीएफकडून कडवे आव्हान आहे. गेल्या निवडणुकीत एलडीएफने ९९ जागांसह स्पष्ट बहुमत मिळवले होते. यंदा सत्ता टिकवण्याचे आव्हान विजयन यांच्यासमोर आहे.

आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली भाजप सत्तेत आहे. नागरिकत्व कायदा आणि एनआरसी यांसारख्या मुद्द्यांमुळे ही निवडणूक विशेष महत्त्वाची ठरली आहे. काँग्रेसने महाआघाडी करून जोरदार लढत दिली आहे.

पुद्दुचेरीमध्ये मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सत्तेत आहे. येथे काँग्रेस-डीएमके आघाडीने सत्ताधाऱ्यांना कडवी टक्कर दिली आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात बारामती आणि राहुरी येथील पोटनिवडणुकांचे निकालही लक्षवेधी ठरणार आहेत. बारामतीत सुनेत्रा पवार तर राहुरीत अक्षय कर्डिले यांच्या विजयाची चर्चा रंगली आहे.

### महामार्ग पोलिसांकडून कठोर कारवाई सुरू

# मिसिंग लिंकवरील सेल्फी महागात पडणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' सुरू झाल्यानंतर काही प्रवासी सेल्फी आणि फोटो काढण्यासाठी वाहनं थांबवत असल्याचे समोर आले आहे. मात्र हा प्रकार आता प्रवाशांना महागात पडणार असून महामार्ग पोलिसांनी यावर कठोर कारवाई सुरू केली आहे. मिसिंग लिंकवर फोटो किंवा सेल्फीसाठी थांबल्यास प्रवाशांना आर्थिक दंड लागू शकतो, तसेच त्यांच्यावर गुन्हाही दाखल होऊ शकतो, असे महामार्ग पोलिसांनी म्हटले आहे.

मिसिंग लिंकवर वाहनं १०० ते १२० किमी प्रतितास वेगाने धावत असतात. अशा परिस्थितीत मध्येच थांबून फोटो काढणे अत्यंत धोकादायक ठरत आहे. त्यामुळेच पोलिसांनी अशा प्रकारांवर बंदी घालत दंडात्मक कारवाईला सुरुवात केली आहे.

मिसिंग लिंक हा प्रकल्प विशेषतः घाटातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि अपघात टाळण्यासाठी उभारण्यात आला आहे. अशा ठिकाणी वाहन थांबवणे म्हणजे स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालणे होय. महामार्ग पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, यापुढे मिसिंग लिंकवर थांबून सेल्फी किंवा फोटो काढणाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल केला जाईल.

पोलिसांकडून केवळ दंडच नव्हे, तर गंभीर प्रकरणांमध्ये गुन्हेही नोंदवले जाणार आहेत. सकाळपासून अशा घटनांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. कारवाई टाळायची असेल तर मिसिंग लिंकवर कुठेही न थांबता प्रवास करा, असे आवाहन महामार्ग पोलिसांनी केले आहे.

दरम्यान, भाजपचे नेते केशव उपाध्ये यांनीही मिसिंग लिंकवर फोटो काढल्याची चर्चा रंगली आहे. सोशल मीडियावर त्यांनी पोस्ट शेअर करत प्रकल्पाचे कौतुक केले, मात्र यावरून वाहतूक नियमांच्या पालनाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

### केस झाली तरी फरक पडत नाही

**बीड :** तालुक्यातील नेकनूर येथे काही दिवसांपूर्वी दोन गटांमध्ये झालेल्या दगडफेक आणि राड्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सूचक प्रतिक्रिया दिली आहे. "आमच्यावर केस झाली तरी काही फरक पडत नाही, होऊ द्या जे व्हायचे ते," असे वक्तव्य त्यांनी केले. नेकनूर येथील बंकटस्वामी संस्थानच्या हरिनाम सप्ताहाच्या सांगतेनिमित्त ते येथे आले होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, घटनेनंतर त्यांनी संबंधितांना फोन करून विचारणा केली होती. "कधीही हाक मारा, आम्ही सगळ्यात आधी उभे आहोत. मात्र काही मोजक्या लोकांमुळे संपूर्ण समाजाला दोष देता येणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

# मतमोजणीसाठी ताकद एकवटली

### निवडणूक आयोगाकडून ४३२ निरीक्षकांची नियुक्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालांची वेळ आता जवळ आली आहे. सोमवारी राज्यातील २९३ जागांवर (फाल्टा वगळून) होणारी मतमोजणी पारदर्शक आणि निष्पक्ष करण्यासाठी निवडणूक आयोगाने पूर्ण ताकद लावली आहे. आयोगाने शनिवारी काउंटिंग ऑब्झर्व्हरची अधिकृत यादी जाहीर केली असून त्यानुसार एकूण ४३२ निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आयोगाच्या यादीनुसार, यावेळी उत्तर २४ परगणा जिल्हा मतमोजणीच्या केंद्रस्थानी राहणार आहे. येथे ३३ जागांसाठी सर्वाधिक ४९ काउंटिंग ऑब्झर्व्हर नेमण्यात आले आहेत. त्यानंतर दक्षिण २४ परगणा जिल्ह्याचा क्रमांक लागतो, जिथे ३१ जागांसाठी ४५ निरीक्षकांची मोठी टीम तैनात करण्यात आली आहे.

जिथे मोठ्या जिल्ह्यांमध्ये निरीक्षकांची मोठी फौज तैनात करण्यात आली आहे, तिथे अलीपुरद्वार जिल्ह्यात सर्वात कमी निरीक्षक नेमण्यात आले आहेत. राजधानी कोलकाता येथे ११ जागांसाठी १२ निरीक्षक तैनात असतील.

यंदा आयोगाने विशेषतः त्या मतदारसंघांवर लक्ष केंद्रित केले आहे जिथे एकापेक्षा अधिक मतमोजणी कक्ष आहेत. अशा केंद्रांसाठी १६५ अतिरिक्त काउंटिंग ऑब्झर्व्हर नियुक्त करण्यात आले आहेत.

मतमोजणी केंद्रांच्या बाहेरील सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था मजबूत ठेवण्यासाठी ७७ पोलीस निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयोगाने स्पष्ट निर्देश दिले आहेत की हे पोलीस निरीक्षक कोणत्याही परिस्थितीत मतमोजणी कक्षात प्रवेश करणार नाहीत. त्यांचे काम बाहेरील परिसरात समन्वय साधणे आणि सुव्यवस्था राखणे हे असेल.

### राष्ट्रीय स्तरापासून राज्य सरकारांत मोठे निर्णय होण्याचे संकेत

# बंगालचा निकाल लागताच भाजप संघटनेत फेरबदल?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल उद्या, सोमवारी (दि. ४) जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्षामध्ये राष्ट्रीय स्तरावरील संघटनात्मक बदलांपासून ते राज्य सरकारांतील फेरबदलांपर्यंत अनेक मोठे निर्णय होण्याची प्रक्रिया वेगवान होण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. पक्षसूत्रांच्या माहितीनुसार, मे महिना हा भाजप पक्षसंघटनेच्या अनेक प्रलंबित निर्णयांना अंतिम रूप देणारा ठरू शकतो. महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्द्याला धार देण्यासाठी भाजप पक्षसंघटनेपासून अन्यत्र महिलांना जास्तीत जास्त संधी देण्याचे धोरण पक्षनेतृत्व अंमलात आणू शकते. विधानसभांच्या निवडणूक निकालानंतर भाजपमध्ये संघटनात्मक पुनर्रचना, नेतृत्वाचा समतोल आणि महिलांना वाढते प्रतिनिधित्व या मुद्द्यांवर आधारित महत्त्वाचे निर्णय दिल्लीच्या पातळीवरून वेगाने घेतले जाण्याची प्रक्रिया व त्यातील महिलांच्या सहभागाचा मुद्दा या घडामोडींचा केंद्रबिंदू ठरणार आहे. नितीन नवीन यांची पक्षाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतही याच महिन्यात फेरबदल होण्याची शक्यता आहे. नवीन यांच्या नव्या संघात अनुभवी आणि युवा नेतृत्वाचा समतोल राखण्यावर भर दिला जाणार असल्याचे संकेत आहेत. त्यातही महिलांना अधिक प्राधान्य देण्याची भूमिका घेताना नवीन यांच्या संघातही ३३ टक्क्यांहून अधिक पदे महिलांना दिली जाण्याची दाट शक्यता आहे. यामुळे पक्षाच्या संघटनात्मक रचनेतही महिलांचे प्रतिनिधित्व लक्षणीयरीत्या वाढणार आहे.
पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये निवडणुका असलेल्या उत्तर प्रदेशमध्ये राजकीय हालचाली वेगाने सुरू झालेल्या असताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या विस्ताराची तयारी पूर्ण झाल्याचे सांगितले जाते. जेमतेम १० महिन्यांवर आलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा विस्तार महत्त्वाचा मानला जात आहे. यामध्ये योगी मंत्रिमंडळातील रिक्त पदे भरण्यासह काही विद्यमान मंत्र्यांच्या खात्यांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. बिहारमध्येही सरकार विस्तार अपेक्षित आहे. नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपद सोडून राज्यसभा सदस्यत्व स्वीकारल्यावर नवे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात विस्ताराला गती देणे केंद्रीय नेतृत्वाला भाग आहे. भाजप आणि जदयू यांच्यातील सत्तावाटप सूत्रानुसार दोन्ही पक्षांना समान प्रतिनिधित्व दिले जाऊ शकते. प्रत्येक पक्षाकडे १६-१६ मंत्रीपदे असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या मुख्यमंत्र्यांकडे असलेली काही खाती भाजप कोट्यातील मंत्र्यांना दिली जाऊ शकतात, तर उपमुख्यमंत्र्यांकडील विभाग जदयूच्या कोट्यातील मंत्र्यांना दिले जाण्याची शक्यता आहे. नितीशकुमार यांच्या इच्छेनुसार निशांतकुमार यांना बिहारचे उपमुख्यमंत्रिपद मिळणे अपेक्षित आहे.

# बच्चू कडू म्हणाले, "मी खुश; पण बायको नाराज"

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून बच्चू कडू यांना विधान परिषदेची उमेदवारी मिळाली आहे. ही निवडणूक बिनविरोध होत असून त्यांची आमदारकी आता केवळ औपचारिकता उरली आहे. आमदारकी मिळाल्याने बच्चू कडू आनंदात असले, तरी "आता ते आपल्याला वेळ देणार नाहीत" या कारणामुळे त्यांच्या पत्नी नाराज असल्याचे खुद्द कडू यांनी एका मुलाखतीत सांगितले.

यावेळी बोलताना कडू म्हणाले, पराभवानंतर माझ्या पत्नीला वाटले होते की आता पाच वर्षे कटकट नाही. मीदेखील आंदोलन आणि शेतीच्या कामाला लागलो होतो. अलीकडेच केळीची लागवड केली आणि गायीचे दूध काढणेही शिकत होतो. मात्र अचानक टीव्हीवरील बातम्या पाहून माझी पत्नी अस्वस्थ झाली. शिवसेनेत प्रवेशानंतर त्यांना विधान परिषदेची उमेदवारी जाहीर झाली असून त्यांना मंत्रिपद मिळण्याचीही चर्चा सुरू आहे.

यावर प्रतिक्रिया देताना कडू म्हणाले, "मी स्वतःसाठी काहीच मागितले नाही आणि पुढेही मागणार नाही. दिवंगत आर. आर. पाटील यांनीदेखील मला राज्यमंत्रिपदाची ऑफर दिली होती; मात्र मी ती स्वीकारली नव्हती." ते म्हणाले, "मंत्रिपद मिळो वा न मिळो, मी माझ्या कामाला सुरुवात केली आहे. विधान परिषदेत वंचित, शेतकरी आणि दिव्यांगांच्या समस्या मांडणार आणि त्यांना न्याय मिळवून देणार आहे."

## संपादकीय

# होर्मुझचा फास आणि आपल्या चुली!



**इराण-इस्रायल संघर्षाचा धूर आता होर्मुझच्या समुद्रधुनीतून थेट भारतीय स्वयंपाकघरापर्यंत पोहोचला आहे. भारतासाठी ही सामरिक समस्या नसून, ऊर्जा सुरक्षेचा आणि महागाईचा एक अत्यंत जटिल पेच बनला आहे, हे नक्की.**

जागतिक राजकारणाच्या पटावर जेव्हा जेव्हा मध्यपूर्वेत ठिणगी पडते, तेव्हा त्याचे चटके सात समुद्र पार करून भारतीय उपखंडाला बसणे, ही जणू आता आपली नियतीच झाली आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील अघोषित युद्धाच्या छायेखाली 'होर्मुझची समुद्रधुनी' पुन्हा एकदा धगधगू लागली आहे. पण यावेळी हे प्रकरण केवळ राजनैतिक हॉटेलांमधील चर्चांपुरते मर्यादित नाही; ते थेट भारताच्या 'एलपीजी' पुरवठ्याशी आणि पर्यायाने सामान्य माणसाच्या खिशाशी येऊन भिडले आहे. 'सर्व शक्ती' हे भारतीय जहाज तिथे तांत्रिक कारणास्तव अडकून पडणे, ही भारताच्या ऊर्जा सुरक्षेला बसलेली एक 'सामरिक चपराक' आहे. मुळात होर्मुझची समुद्रधुनी म्हणजे जागतिक तेल आणि वायू व्यापाराची मुख्य धमनी आहे. ओमान आणि इराण यांच्या दरम्यानची ही चिंचोळी पट्टी जगातील एकूण एलपीजी व्यापाराचा सुमारे वीस टक्के भार वाहते. भारतासाठी तर हा मार्ग म्हणजे एक प्रकारची 'जीवनवाहिनी'च. आपण वापरत असलेल्या एकूण एलपीजीपैकी निम्म्याहून अधिक वाटा आपण आयात करतो आणि त्यातील तब्बल ८० टक्क्यांहून अधिक पुरवठा याच मार्गाने आपल्या बंदरांपर्यंत येतो. अशा वेळी इराणने तिथे कुरघोडी सुरू करणे किंवा इस्रायलशी असलेल्या वादात या मार्गाचा वापर 'शस्त्र' म्हणून करणे, हे भारताच्या ऊर्जेचे गणित कोलमडण्यास पुरेसे आहे. भूराजकीय साठमारीत जेव्हा दोन मोठे खेळाडू आपली ताकद अजमावत असतात, तेव्हा भारतासारख्या देशांची अवस्था ही 'दोन दगडांत अडकलेल्या गवतासारखी' होते. इराण हा भारताचा पारंपरिक मित्र असला आणि आपण 'चाबहार'च्या कितीही गप्पा मारत असलो, तरी स्वतःच्या अस्तित्वाच्या लढाईत इराण भारताच्या हिताची काळजी करेलच, ही केवळ एक 'भाबडी आशा' ठरेल. भारताचे एलपीजी टँकर तिथे अडकून पडणे ही एक गंभीर 'धोक्याची घंटा' आहे. जर हा मार्ग दीर्घकाळ बंद राहिला, तर आपल्याला आफ्रिका किंवा अमेरिकेकडून गॅस मागवावा लागेल. हे तांत्रिकदृष्ट्या शक्य असले तरी आर्थिकदृष्ट्या 'परवडणारे' नक्कीच नाही. लांबचा प्रवास म्हणजे वाढलेले भाडे आणि विम्याचे अवाढव्य हप्ते; ज्याचा अंतिम भार भारतीय गृहिणींच्याच डोक्यावर पडणार, हे उघड आहे. सध्याचे जागतिक अर्थकारण हे केवळ मागणी-पुरवठ्यावर नव्हे, तर 'सामरिक वर्चस्वाच्या' लहरी खेळावर उभे आहे. भारताची अर्थव्यवस्था वेगाने धावत असताना आपली ऊर्जेची भूकही तितकीच वाढत आहे. अशा वेळी आपण एकाच प्रदेशावर इतके 'जीवघेणे' अवलंबून राहणे, हे आपल्या धोरणकर्त्यांचे अपयश नाही का? 'चायना प्लस वन'च्या धर्तीवर आपण 'मिडल ईस्ट प्लस वन' असे ऊर्जा धोरण राबवण्यात कुठे तरी तोकडे पडलो आहोत, हे वास्तव मान्य करण्यातच शहाणपण आहे. कतार, सौदी अरेबिया आणि यूएई हे आपले प्रमुख पुरवठादार याच मार्गाचे ओलीस आहेत. इराणने हा मार्ग रोखला, तर केवळ पुरवठा खंडित होणार नाही, तर जागतिक बाजारात किमतींचा असा भडका उडेल की महागाईचा आलेख पुन्हा एकदा अनियंत्रित होईल. इराण आणि इस्रायल यांच्यातील हा संघर्ष केवळ भूभागासाठी नसून तो वर्चस्वाचा आणि अहंकाराचा लढा आहे. इस्रायलची लष्करी ताकद आणि इराणची भौगोलिक स्थिती यांच्या कात्रीत जगाची कोंडी झाली आहे. होर्मुझची समुद्रधुनी हा इराणचा सर्वात मोठा 'हुकमी एक्का' आहे. रशियाकडून स्वस्त तेल घेऊन आपण मध्यंतरी स्वतःचीच पाठ थोपटून घेतली होती. पण एलपीजीच्या बाबतीत रशिया आपला तारणहार ठरू शकत नाही, हीच खरी 'आर्थिक मेख' आहे. आपण सौर ऊर्जा आणि हायड्रोजन इंधनाच्या स्वप्निल गप्पा मारत असलो, तरी आजचे कठोर वास्तव गॅस आणि तेलाच्या पिंभावर उभे आहे. जोपर्यंत आपण आपल्या ऊर्जा मार्गांचे खऱ्या अर्थाने विविधीकरण करत नाही, तोपर्यंत होर्मुझमधील प्रत्येक हालचाल दिल्लीतील सर्वसामान्यांच्या बजेटला हादरे देत राहील. होर्मुझचा हा फास भारताला हेच बजावत आहे की, जागतिक राजकारणात कुणीही कुणाचा कायमचा मित्र नसतो. आपली ऊर्जा सुरक्षा ही कोणत्याही एका भौगोलिक मार्गाच्या किंवा राष्ट्राच्या दयेवर असता कामा नये. रस्ते आणि बंदरांचे जाळे विणताना ऊर्जेच्या सुरक्षित मार्गांकडे दुर्लक्ष करणे हे भविष्यात महागात पडू शकते. अन्यथा, मध्यपूर्वेतील वाळवंटात उठलेले धुळीचे वादळ आपल्या घरातली चूल विझवायला वेळ लावणार नाही.

# अनिश्चिततेचे जगावर पसरलेले दाट सावट!



**» अमेरिकेच्या मध्यवर्ती बँकेने (फेडरल रिझर्व्ह) व्याजदरांबाबत घेतलेली सावध भूमिका आणि ट्रम्प व शी जिनपिंग यांच्या आगामी भेटीमुळे जागतिक अर्थकारणावर अनिश्चिततेचे दाट सावट निर्माण झाले आहे.**

कोणत्याही देशाच्या मध्यवर्ती बँकेचे मुख्य काम म्हणजे अर्थव्यवस्थेच्या रथाचे सारथ्य करताना महागाईचा वेग आणि विकासाची गती यांचा सुवर्णमध्य साधणे. परंतु, जेव्हा मार्गातच राजकीय आणि जागतिक अनिश्चिततेचे मोठे खड्डे पडलेले असतात, तेव्हा या सारथ्याची खरी कसोटी लागते. सध्या अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'ची (फेड) अवस्था नेमकी अशीच काहीशी झाली आहे. 'फेड'च्या नुकत्याच झालेल्या पतधोरण आढाव्याने एक गोष्ट लख्खपणे अधोरेखित केली आहे, ती म्हणजे आगामी काळ हा कमालीच्या अनिश्चिततेचा आणि आर्थिक गुंतागुंतीचा असणार आहे. या अनिश्चिततेच्या केंद्रस्थानी आहेत ते अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि चीनचे सर्वेसर्वा शी जिनपिंग. या दोन जागतिक महासत्तांच्या प्रमुखांची आगामी भेट ही केवळ एक राजनैतिक औपचारिकता नसून, ती जागतिक अर्थकारणाची पुढची दिशा किंवा दुर्दशा ठरवणारी एक अत्यंत कळीची घटना ठरणार आहे.

अमेरिकेच्या अध्यक्षपदावर ट्रम्प यांच्या पुनरागमनाने जागतिक राजकारणात आणि अर्थकारणात आधीच एका नव्या अस्वस्थतेची पेरणी केली आहे. जागतिक व्यापार संघटनेसारख्या (डब्लूटीओ) संस्थांना वाटाण्याच्या अक्षता लावून केवळ अमेरिकेचा फायदा पाहण्याची त्यांची वृत्ती जागतिक व्यापारासाठी मारक ठरत आहे. शी जिनपिंग यांचा चीन सध्या एका विचित्र आणि ऐतिहासिक कोंडीत सापडला आहे. एकेकाळी 'जगाचा कारखाना' म्हणून मिरवणारा आणि सातत्याने दुहेरी अंकात विकासदर नोंदवणारा चीन आता स्वतःच्याच अंतर्गत आर्थिक दुखण्यांनी त्रस्त आहे. अशा या नाजूक परिस्थितीत डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारख्या लहरी नेत्याशी दोन हात करणे शी जिनपिंग यांच्यासाठी अजिबात सोपे नाही. परंतु, थेट माघार घेणे हे त्यांच्या हुकूमशाही वर्चस्वाला आणि देशांतर्गत राजकीय अस्तित्वासाठी मारक ठरू शकते. या राजकीय साठमारीचा थेट परिणाम अमेरिकेच्या 'फेड'वर का होतो, हे समजून घेणे आवश्यक आहे. जर ट्रम्प यांनी चीनविरुद्ध पुन्हा एकदा आक्रमक व्यापारयुद्ध पुकारले आणि चिनी वस्तूंवर भरमसाठ आयात शुल्क लादले, तर त्याचे थेट पर्यवसान अमेरिकेतील महागाई वाढण्यात होईल. स्वस्त चिनी वस्तूंवर अमेरिकन ग्राहकांची आणि पर्यायाने तिथल्या अर्थव्यवस्थेची मोठी भिस्त असते. हे आयात शुल्क वाढले की वस्तू महागतील आणि महागाईचा आलेख जो आता कुठे कसाबसा आटोक्यात आला होता, तो पुन्हा वर जाईल. महागाई वाढली की 'फेड'ला नाईलाजाने व्याजदर वाढवावे लागतील किंवा ते चढेच ठेवावे लागतील. सध्या अमेरिकन अर्थव्यवस्थेला मंदीच्या छायेतून बाहेर काढण्यासाठी आणि उद्योगांना चालना देण्यासाठी व्याजदर कपातीची नितांत आवश्यकता आहे. परंतु, ट्रम्प यांच्या संभाव्य आक्रमक आणि लहरी धोरणांमुळे 'फेड'चे हात पूर्णपणे बांधले गेले आहेत. कोविड काळानंतर जगाने चीनवरील आपले अवलंबित्व कमी करण्यासाठी 'चायना प्लस वन' हे धोरण राबवण्यास सुरुवात केली होती. संपूर्ण जगाची पुरवठा साखळी रातोरात बदलता येत नाही. त्यासाठी लागणारा वेळ आणि प्रचंड पैसा हा जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा ताण आणणारा आहे. हा तिढा केवळ अमेरिका, चीन किंवा विकसित देशांपुरता मर्यादित नाही. भारतासारख्या देशाला कच्च्या तेलासाठी मोठ्या प्रमाणावर आयात करावी लागते, रुपया घसरल्यास आपले आयात बिल वाढते आणि पर्यायाने देशांतर्गत महागाई भडकते. जागतिक वावटळीपासून आपण पूर्णपणे सुरक्षित नाही. आपला वाढता परकीय चलन साठा आणि रिझर्व्ह बँकेचे योग्य व्यवस्थापन यामुळे आपल्याला तात्पुरता दिलासा मिळू शकतो, परंतु ही दीर्घकालीन अनिश्चितता आपल्याही विकासाच्या गतीला मोठा ब्रेक लावू शकते.

अर्थकारण हे कधीही राजकारणापासून वेगळे असू शकत नाही आणि राजकारण हे नेत्यांच्या महत्त्वाकांक्षेपासून मुक्त नसते. ट्रम्प आणि शी यांच्या आगामी भेटीतून लगेचच एखादा मोठा सुवर्णमध्य निघेल आणि जागतिक व्यापाराचे गाडे पुन्हा सुरळीत रुळावर येईल, अशी भाबडी आशा बाळगणे निव्वळ मूर्खपणाचे ठरेल. या भेटीतून नव्या अटी, नवे इशारे आणि नव्या निर्बंधांची मालिका सुरू होण्याचीच शक्यता अधिक. 'फेड'च्या धोरणकर्त्यांनी हीच धोक्याची घंटा बरोबर ओळखली आहे आणि म्हणूनच त्यांनी आपल्या पतधोरण आढाव्यातून या 'अनिश्चितते'वर अचूक बोट ठेवले आहे. अशा या लहरी आणि आत्मकेंद्रित नेत्यांच्या हाती जागतिक अर्थव्यवस्थेची सूत्रे असताना, अनिश्चितता हाच आता जागतिक अर्थकारणाचा एकमेव नियम बनला आहे. या नव्या वास्तवाची सवय करून घेणे आणि संभाव्य धक्क्यांसाठी अर्थव्यवस्था सज्ज ठेवणे, एवढेच आता जगाच्या हाती आहे.

# स्वगणनेतून जनगणना मोहिमेला सुरुवात

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** राष्ट्रीय जनगणना २०२७ प्रक्रियेला महाराष्ट्रात औपचारिक प्रारंभ झाला असून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी स्वगणना करून या मोहिमेचा शुभारंभ केला. नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.



महापालिका मुख्यालयात १ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त पार पडलेल्या ध्वजारोहण सोहळ्यानंतर डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जनगणनेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन स्वतःची माहिती ऑनलाइन भरत स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली. सुमारे ३४ प्रश्नांची माहिती भरल्यानंतर त्यांना 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त झाला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेतल्याने नागरिकांसमोर एक आदर्श निर्माण झाला आहे.

यावेळी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जनगणनेचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, जनगणना ही केवळ लोकसंख्येची मोजणी नसून देशाच्या सर्वांगीण विकासाचा आधारस्तंभ आहे. शासनाच्या विविध धोरणे आणि योजनांची आखणी अचूक आकडेवारीवर आधारित असते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने प्रामाणिकपणे आणि अचूक माहिती देणे अत्यावश्यक आहे. स्वगणना ही सोपी, सुरक्षित आणि वेळ वाचवणारी प्रक्रिया असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनगणना मोहिमेचा पहिला टप्पा म्हणून १ मे ते १५ मे २०२७ या कालावधीत नागरिकांना घरबसल्या स्वगणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात १६ मे ते १४ जून २०२७ दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी भेट देऊन माहिती संकलित केली जाणार आहे.

या पार्श्वभूमीवर, अधिकाधिक नागरिकांनी स्वगणनेचा पर्याय स्वीकारून राष्ट्रीय जनगणना प्रक्रियेत सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत खेळांनाही प्राधान्य द्यावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीबरोबरच खेळांनाही तितकेच महत्त्व द्यावे, असे प्रतिपादन महापौर रवी लांडगे यांनी केले. महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाच्या निमित्ताने यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स संस्थेतर्फे आयोजित प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते.

औद्योगिक कंपन्यांमधील 'शिका आणि कमवा' तसेच अप्रेंटिस योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना आणि संघभावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

महापौर रवी लांडगे यांनी सांगितले की, क्रिकेटसारख्या संघ खेळांमुळे टीमवर्क, प्रसंगावधान आणि नेतृत्वगुण विकसित होतात. विद्यार्थ्यांनी केवळ बौद्धिकदृष्ट्या नव्हे तर शारीरिकदृष्ट्याही सक्षम असणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

या स्पर्धेत यशस्वी संस्थेतर्फे एल अँड एल प्रोडक्ट कंपनीमध्ये ऑन-द-जॉब ट्रेनिंग घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संघाने विजेतेपद पटकावले. विजेत्या संघाला महापौरांच्या हस्ते करंडक प्रदान करण्यात आला. तसेच उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, सामनावीर आणि मालिकावीर ठरलेल्या विद्यार्थ्यांनाही गौरविण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे ऑपरेशन प्रमुख कृष्णा सावंत, मार्केटिंग प्रमुख प्रशांत कुलकर्णी, तसेच अधिकारी, प्रशिक्षक उपस्थित होते.

# ४२ अनधिकृत नळजोड खंडीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात पाणी चोरीचा नवीन प्रकार समोर आल्यानंतर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने कठोर कारवाई करत चिखली व मोरेवस्ती परिसरातील ४२ अनधिकृत नळजोड खंडीत केले आहेत. अधिकृत नळजोडासोबतच अतिरिक्त अनधिकृत जोड घेऊन पाणी चोरी करणाऱ्यांना यामुळे मोठा दणका बसला आहे. प्रशासनाने पुन्हा अशा प्रकारे नळजोड घेतल्यास कडक कायदेशीर कारवाईचा इशाराही दिला आहे.

महापालिकेकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरात मागील साडेसहा वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. एकूण पाण्यापैकी सुमारे ३५ टक्के पाणी गळती व चोरीमुळे वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे. वाढती लोकसंख्या आणि मर्यादित पाणी उपलब्धता यामुळे दररोज पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याची मागणी वाढली असून अनेक भागांत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी आहेत.

या परिस्थितीत काही नागरिकांकडून थेट नळजोडांना मोटार पंप बसवून पाणी उपसा करण्याचे प्रकारही समोर आले आहेत. यामुळे इतर भागांतील पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असल्याने महापालिकेने अशा अनधिकृत प्रकारांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

# स्वगणनेतून जनगणना २०२७ मोहिमेला गती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** देशातील महत्त्वपूर्ण जनगणना २०२७ मोहिमेला महाराष्ट्रात १ मेपासून सुरुवात झाली असून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर सौ. शर्मिला राजेंद्र बाबर यांनी स्वतः ऑनलाईन स्वगणना पूर्ण करत या उपक्रमाला चालना दिली आहे.

त्यांच्या या पुढाकारामुळे नागरिकांमध्ये जनजागृती वाढण्यास मदत होत असून, अधिकाधिक नागरिकांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

उपमहापौर शर्मिला बाबर यांनी अधिकृत संकेतस्थळावर भेट देत आवश्यक माहिती अचूकपणे भरून स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली. सर्व प्रश्नांची विश्वासार्ह माहिती नोंदवत त्यांनी यशस्वी नोंदणी करून सेल्फ एन्युमरेशन आयडी प्राप्त केला. लोकप्रतिनिधी म्हणून स्वतः पुढाकार घेत त्यांनी नागरिकांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

यावेळी बोलताना त्यांनी जनगणनेचे महत्त्व स्पष्ट करत सांगितले की, "जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. प्रत्येक नागरिकाकडून मिळणारी अचूक व विश्वासार्ह माहिती शासनाच्या नियोजनासाठी उपयोगी ठरते. त्यामुळे प्रत्येकाने जबाबदारीने स्वगणना पूर्ण करणे आवश्यक आहे."

स्वगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा १ मे ते १५ मे २०२७ या कालावधीत राबविण्यात येत असून, नागरिकांना घरबसल्या मोबाईल किंवा संगणकाद्वारे ही प्रक्रिया सोप्या आणि सुरक्षित पद्धतीने पूर्ण करता येणार आहे. त्यानंतर १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी भेट देऊन पुढील टप्प्यातील जनगणना प्रक्रिया पार पडणार आहे.

उपमहापौर शर्मिला बाबर यांनी पिंपरी-चिंचवडकर नागरिकांना आवाहन करताना नमूद केले की, जनगणना म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकाची अधिकृत नोंद असून याच माहितीच्या आधारे शाळा, रस्ते, रुग्णालये, पाणीपुरवठा, वीज, रोजगार तसेच विविध शासकीय योजना प्रभावीपणे राबवल्या जातात. अचूक जनगणना ही वेगवान आणि सर्वसमावेशक विकासाचा पाया ठरते.

केंद्र सरकारच्या स्व-जनगणना सुविधेअंतर्गत नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर जाऊन स्वतःची माहिती भरावी आणि 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त करून घ्यावा. त्यानंतर जनगणना अधिकारी भेट दिल्यावर केवळ हा आयडी दाखवून प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

नागरिकांनी निर्धास्तपणे या उपक्रमात सहभागी व्हावे, कारण दिलेली सर्व माहिती पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय ठेवली जाणार असून ती केवळ राष्ट्रीय विकासासाठीच वापरली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. "चला, स्व-जनगणनेत सहभागी होऊया आणि देशाच्या विकासात आपला मोलाचा वाटा उचलूया," असे आवाहनही त्यांनी शेवटी केले.

## निगडी प्राधिकरण येथे रंगले महानाट्य

# पिंपरी-चिंचवडमध्ये 'जाणता राजा' महानाट्याचा जल्लोष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महाराष्ट्र दिन, जागतिक कामगार दिन आणि मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'जाणता राजा' या भव्य ऐतिहासिक महानाट्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. निगडी प्राधिकरण येथील मदनलाल धिंग्रा मैदानावर रंगलेल्या या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचा प्रभावी आणि थरारक पट उलगडण्यात आला.



महापौर रवि लांडगे यांनी या महानाट्याच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, शिवरायांचे आदर्श नेतृत्व, दूरदृष्टी आणि जनकल्याणकारी विचार समाजापर्यंत पोहोचवण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला दिलेला प्रतिसाद अभिमानास्पद असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्या शैलजा मोरे, नगरसदस्य अमित गावडे, उपआयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्र दिनाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वावर प्रकाश टाकताना, राज्याच्या अस्मितेचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले. आमदार उमा खापरे यांनी 'जाणता राजा' या महानाट्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा जिवंत इतिहास अनुभवण्याची संधी मिळाल्याचे सांगत, हा कार्यक्रम प्रत्येकासाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. शिवरायांचा पराक्रम, दूरदृष्टी आणि जनकल्याणकारी विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे मोठे कार्य या महानाट्यामुळे होत असल्याचे त्यांनी सांगितले.

पद्मभूषण बाबासाहेब पुरंदरे लिखित व दिग्दर्शित 'जाणता राजा' या महानाट्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाचा भव्य आणि प्रभावी पट उलगडला. शेकडो कलाकारांचा सहभाग, नेत्रदीपक नेपथ्य, वास्तवदर्शी युद्धदृश्ये, पारंपरिक वेशभूषा आणि प्रभावी प्रकाशयोजना यामुळे प्रेक्षक इतिहासाच्या साक्षीदार ठरले. स्वराज्याची स्थापना, आदर्श शासनव्यवस्था, शौर्य, कर्तृत्व आणि जनकल्याणकारी दृष्टिकोन या सर्व पैलूंना स्पर्श करत 'जाणता राजा' हे महानाट्य केवळ मनोरंजन न ठरता एक प्रभावी संस्कारमंच म्हणून उभे राहिले. नागरिकांनी दिलेल्या प्रचंड प्रतिसादामुळे हा उपक्रम शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा ठरला आहे.

# 'मिसिंग लिंक'चा परिणाम; एक्सप्रेस-वे कोंडीमुक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणावळा :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेला दावा प्रत्यक्षात उतरत मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे शनिवारी पूर्णपणे कोंडीमुक्त झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. लॉग वीकेंडचा दिवस असूनही मार्गावर कुठेही वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या नाहीत.

मुंबईहून पुण्याकडे जाणारी बहुतांश प्रवासी वाहने आणि एसटी बस 'मिसिंग लिंक' मार्गे वळवल्याने खंडाळा घाट परिसरातील पारंपरिक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी झाली. शनिवार-रविवारी नेहमीच किलोमीटरच्या अंतरावर लागणाऱ्या वाहनांच्या रांगा यावेळी दिसून आल्या नाहीत. घाट विभागात तुरळक वाहतूक असून संपूर्ण मार्ग सुरळीत सुरू होता. एक्सप्रेस-वेवरील वाहतूककोंडीची दीर्घकालीन समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सुमारे ७,१०० कोटी रुपये खर्चून खालापूर ते सिंहगड कॉलेज, लोणावळा दरम्यान 'मिसिंग लिंक' प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पात १.५८ किमी व ८.८६ किमी लांबीचे दोन बोगदे तसेच ८५० मीटर व ६५० मीटर लांबीचे दोन व्हायडक्ट पूल उभारण्यात आले आहेत.

या प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आले होते.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ताराबाई राक्षे यांचे निधन



**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील राक्षेवाडी येथील ताराबाई बबनराव राक्षे (वय ८४) यांचे शुक्रवारी (दि. १) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ताराबाई राक्षे यांच्या पश्चात चार मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती तथा विद्यमान संचालक अशोक राक्षे यांच्या मातोश्री होत. तसेच राजगुरुनगर वकील बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष अ‍ॅड. अनिल राक्षे आणि राक्षेवाडी गावचे पोलीस पाटील पप्पूकाका राक्षे हे त्यांचे पुतणे होत. त्यांच्या निधनामुळे सामाजिक व कौटुंबिक क्षेत्रात शोककळा पसरली असून, विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

### ऑर्केस्ट्रा वादातून तरुणाला मारहाण

**सासवड :** ऑर्केस्ट्रा कार्यक्रमातील जुन्या वादाचा राग मनात धरून एका तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना सासवड येथील पालखी मैदान परिसरात घडली. या प्रकरणी सासवड पोलिसांनी बेलसर येथील दोन आरोपींसह इतर तीन ते चार अनोळखी व्यक्तींविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल केले आहेत. ही घटना गुरुवारी (दि. ३०) सकाळी सुमारे पाऊणे बारा वाजण्याच्या सुमारास घडली. अदित्य सुरेश खेंगरे (रा. तक्रारवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे) असे मारहाणीत जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभम जगताप आणि अमर जगताप (दोघे रा. बेलसर) यांच्यासह इतर अनोळखी ३ ते ४ जणांनी अदित्य खेंगरे यांना अडवून जुन्या वादातून मारहाण केली. यात खेंगरे यांना दुखापत झाली असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याप्रकरणी अदित्य खेंगरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अल्पवयीन आरोपी ताब्यात; परिसरात खळबळ

# चाकणमध्ये 3 वर्षीय बालकाची निर्घृण हत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**चाकण :** चाकण एमआयडीसी परिसरातील खालुंब्रे येथे तीन वर्षांच्या बालकावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याची चाकूने गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह सुटकेसमध्ये लपवण्यात आल्याचेही तपासात समोर आले आहे. या प्रकरणातील अल्पवयीन आरोपीला दक्षिण महाळुंगे पोलिसांनी पुणे रेल्वे स्थानकावरून ताब्यात घेतले.

मृत बालकाची आई खालुंब्रे परिसरात मजुरीचे काम करत असून, शुक्रवारी दुपारी तिचा मुलगा घरासमोर खेळत असताना अचानक बेपत्ता झाला. परिसरात शोध घेतल्यानंतरही तो न सापडल्याने पोलिसांत तक्रार देण्यात आली. घटनेची गंभीरता लक्षात घेऊन दक्षिण महाळुंगे पोलिसांनी तातडीने तपास सुरू करत पोक्सो कायद्यासह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल केला.

तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील खोल्यांची झडती घेतली असता एका बंद खोलीबाबत संशय निर्माण झाला. दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता, एका सुटकेसमध्ये रक्ताने माखलेला बालकाचा मृतदेह आढळून आला. यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपास व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा माग काढला. तपासात उघड झाले की, आरोपीने बालकावर अत्याचार करून त्यानंतर चाकूने गळा चिरून हत्या केली. संबंधित आरोपी महिनाभरापूर्वी बिहारहून चाकणमध्ये मजुरीसाठी आला होता. गुन्ह्यानंतर तो खोलीला कुलूप लावून पसार झाला होता. पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे पुणे रेल्वे स्थानकावर सापळा रचून त्याला ताब्यात घेतले, तेव्हा तो बिहारला जाण्याच्या तयारीत होता.

दक्षिण महाळुंगे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार खून व लैंगिक अत्याचारासंदर्भातील गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अनिल देवडे करत आहेत.

दरम्यान, मृत बालकाचे कुटुंब मूळ मध्य प्रदेशातील असून कामानिमित्त चाकण परिसरात वास्तव्यास होते. या घटनेमुळे परिसरात संताप व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## खेड शिक्षक पतसंस्थेच्या सभापतीपदी शांताराम नेहेरे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर :** खेड तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सभापतीपदी शांताराम नेहेरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून, उपसभापतीपदी साहिर शिकलगार आणि मानद सचिवपदी तृष्णा घुमटकर यांचीही निवड एकमताने झाली आहे. विशेष म्हणजे, शांताराम नेहेरे यांनी यापूर्वी सलग २० वर्षे संचालक म्हणून काम करत संस्थेच्या कारभारात सक्रिय भूमिका बजावली आहे.

तालुक्यातील शिक्षकांची आर्थिक गरज भागवणारी ही पतसंस्था सध्या भक्कम आर्थिक स्थितीत असल्याचे दिसून येते. संस्थेत १,२३५ पेक्षा अधिक शिक्षक सभासद असून, एकूण ठेवींचा आकडा ६३ कोटी २१ लाख रुपयांवर पोहोचला आहे. भागभांडवल सुमारे ५३ कोटी ५० लाख रुपये असून, आतापर्यंत १३६ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. सभासदांच्या गरजांचा विचार करून संस्थेमार्फत ३५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज सुलभ अटींवर उपलब्ध करून दिले जाते.

निवडीनंतर झालेल्या सत्कारप्रसंगी बोलताना सभापती शांताराम नेहेरे यांनी संस्थेच्या पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित कारभारावर भर देण्याचे संकेत दिले. "संस्थेची आर्थिक घडी मजबूत ठेवत अधिक पारदर्शकता आणणे आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे, यावर आमचा विशेष भर असेल. सभासदांचे हित जपणे हेच आमचे सर्वोच्च ध्येय आहे," असे त्यांनी सांगितले. नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे संस्थेच्या भविष्यातील कामकाजाला नवे दिशा-निर्देश मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## खेड तालुक्यात उन्हाळी बाजरी फुलोऱ्यात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यात उन्हाळी हंगामातील बाजरीचे पीक सध्या फुलोऱ्यात आले असून यंदा भरघोस उत्पादनाची आशा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. तालुक्यात सुमारे १० हजार हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी बाजरीची लागवड करण्यात आली आहे.

चासकमान धरण तसेच भामा आसखेड धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळे तालुक्यातील बागायती शेतीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः चासकमान धरणाच्या डाव्या कालव्यामुळे सिंचनाची सोय उपलब्ध झाल्याने उन्हाळ्यातही पिकांना वेळेवर पाणी मिळत आहे. परिणामी, उष्णतेचा तडाखा असतानाही पिकांची वाढ समाधानकारक होत आहे.

बाजरीसोबतच भुईमूग, मका तसेच जनावरांसाठी ओला चारा या पिकांवरही शेतकरी लक्ष केंद्रित करत आहेत. याशिवाय भाजीपाला आणि विविध तरकारी पिकांकडेही शेतकऱ्यांचा कल वाढताना दिसत आहे. उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन आणि सिंचन व्यवस्थेमुळे पिकांची स्थिती सध्या चांगली आहे.

उन्हाळी वातावरणामुळे फुलोऱ्यात आलेल्या बाजरीवर कीड व रोगांचा प्रादुर्भाव तुलनेने कमी असल्याचे कृषी क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. त्यामुळे उत्पादनात वाढ होण्याची शक्यता बळावली आहे. अनेक शेतकरी पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बागायती पिकांकडे वळत असल्याने तालुक्यातील कृषी उत्पादनात विविधता निर्माण होत आहे.

यंदा बाजरी, भुईमूग, मका आणि भाजीपाला यांच्या उत्पादनात वाढ झाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही लक्षणीय सुधारणा होण्याची अपेक्षा आहे. उन्हाळ्यात ओल्या चाऱ्याची उपलब्धता वाढल्याने दुग्ध उत्पादनालाही चालना मिळत असल्याचे चित्र आहे.

सद्यस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन आणि अनुकूल हवामान राहिल्यास खेड तालुक्यातील उन्हाळी हंगाम यशस्वी ठरेल, असा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत. यावेळी राजगुरुनगर येथील शेतकरी बाळासाहेब पाचारणे यांनी फुलोऱ्यात आलेल्या बाजरी पिकाची माहिती दिली.

# खेड तालुक्यात मुलींचा दबदबा कायम

## बारावीचा निकाल ८९.६५ टक्के

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर :** महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक (बारावी) परीक्षेचा खेड तालुक्याचा निकाल यंदा ८९.६५ टक्के लागला असून, मुलींनी यंदाही निकालात बाजी मारली आहे. एकूण निकाल समाधानकारक राहिल्याने शैक्षणिक क्षेत्रात समाधान व्यक्त होत आहे.

तालुक्यातील ३३ शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतून यंदा ५ हजार ३३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ४ हजार ७८४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. काही संस्थांनी १०० टक्के निकालाची नोंद करत विशेष कामगिरी बजावली आहे.

प्रियदर्शनी हायस्कूल व ज्युनियर कॉलेज (वाकी), डायनॅमिक इंग्लिश मिडीयम स्कूल (कडूस) आणि ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनियर कॉलेज (राजगुरुनगर) या तीन संस्थांचा निकाल शंभर टक्के लागला. तर रामभाऊ म्हाळगी विद्यालय व ज्युनियर कॉलेज (कडूस) या संस्थेचा निकाल सर्वांत कमी ५५.१७ टक्के इतका नोंदवला गेला.

तालुक्यातील विविध शाळांचा निकाल पुढीलप्रमाणे नोंदवण्यात आला आहे – हुतात्मा राजगुरू महाविद्यालय (राजगुरुनगर) ८८.६६ टक्के, कर्मवीर भाऊराव पाटील ज्युनियर कॉलेज (वाडा) ९१.४२ टक्के, सिताबाई पाटोळे ज्युनियर कॉलेज (चाकण) ९४.१४ टक्के, संत ज्ञानेश्वर विद्यालय ज्युनियर कॉलेज (आळंदी) ९०.११ टक्के, म. फ. गायकवाड विद्यालय ज्युनियर कॉलेज (दावडी) ९०.४७ टक्के, सुभाष माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज (बहुळ) ६६.६६ टक्के, नवीन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (मरकळ) ८९.३९ टक्के, शिवाजी विद्यालय व ज्युनियर कॉलेज (डेहणे) ८१.६९ टक्के, रामचंद्र पाटील औटी उच्च माध्यमिक विद्यालय (आळंदी) ६०.५२ टक्के. तसेच आर्ट्स, कॉमर्स ज्युनियर कॉलेज (पाईट) ९१.७५ टक्के, महात्मा गांधी विद्यालय व ज्युनियर कॉलेज (राजगुरुनगर) ९१.४६ टक्के, नवचैतन्य उच्च माध्यमिक विद्यालय (काळूस) ८६.९५ टक्के, श्री भामचंद्र विद्यालय (भांबोली) ९० टक्के, उच्च माध्यमिक विद्यालय (वाशेरे) ८८ टक्के, श्री समर्थ उच्च माध्यमिक विद्यालय (चिंबळी) ९४.४५ टक्के, बाबुराव पवार माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (बिरदवडी) ८० टक्के, आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज (डेहणे) ८१.४४ टक्के, आर्ट्स कॉमर्स कॉलेज (राजगुरुनगर) ८२.६८ टक्के असे निकाल नोंदवले गेले.

याशिवाय श्री समर्थ ज्युनियर कॉलेज (नाणेकरवाडी) ९३.०२ टक्के, ज्ञानवर्धिनी ज्युनियर कॉलेज (खेड) ७२.३४ टक्के, मॉडर्न हायस्कूल व ज्युनियर कॉलेज (भोसे) ८६.६६ टक्के, श्री शिवाजी विद्यालय व ज्युनियर कॉलेज (शेलपिंपळगाव) ८१.६६ टक्के, श्री संजयशेठ जैद पाटील विद्यावर्धिनी व ज्युनियर कॉलेज (खेड) ९७.१८ टक्के, स्व. भागुबाई पिंगळे विद्यामंदिर व ज्युनियर कॉलेज (खेड) ८१.२५ टक्के, जयहिंद पब्लिक इंग्लिश स्कूल (खेड) ९९.३४ टक्के, शासकीय आयटीआय (चांडोली-राजगुरुनगर) ९२.५९ टक्के, आदिराज प्रायव्हेट आयटीआय (चाकण) ८१.८१ टक्के आणि हुतात्मा राजगुरू हायस्कूल व ज्युनियर कॉलेज (राजगुरुनगर) ९३.६५ टक्के, एसएसव्हीएम सिताबाई भिकाजीराव पाटोळे ज्युनियर कॉलेज (चाकण) ८८.७३ टक्के असा एकूण आढावा आहे.

## योगेश गारगोटे यांची पोलिस उपनिरीक्षकपदी निवड



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्यातील वाकी बुद्रुक येथील शेतकरी कुटुंबातील योगेश दामोदर गारगोटे यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर पोलीस उपनिरीक्षक पदावर यशस्वी झेप घेतली आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

योगेश गारगोटे यांनी सुरुवातीला खासगी कंपनीत नोकरी करत असताना पोलीस दलात प्रवेश मिळवला होता. मात्र आरक्षण प्रक्रियेत झालेल्या गोंधळामुळे त्यांना काही काळासाठी सेवेतून बाहेर पडावे लागले. या धक्क्यानंतरही त्यांनी हार न मानता पुन्हा तयारी सुरू ठेवली. गेल्या वर्षी झालेल्या भरती प्रक्रियेत त्यांनी चांगले गुण मिळवूनही सेवा ज्येष्ठतेच्या निकषामुळे त्यांची निवड होऊ शकली नव्हती. तरीही त्यांनी प्रयत्न सुरू ठेवत यंदाच्या भरतीत उल्लेखनीय यश मिळवले. यावर्षीच्या भरती प्रक्रियेत सुमारे एक लाखांहून अधिक उमेदवारांमधून त्यांनी पीएसआय पद मिळवले आहे. वडिलांचे छत्र अचानक हरपल्याने कुटुंबावर आर्थिक व मानसिक संकट आले होते. अशा परिस्थितीतही त्यांनी खंबीरपणे उभे राहत मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले. या यशाबद्दल जिल्हा परिषद गटनेते तथा बाजार समितीचे सभापती अ‍ॅड. विजयसिंह शिंदे पाटील, सोमनाथ टोपे तसेच वाकी बुद्रुकसह परिसरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## रांजणगाव पोलिसांचा आरोग्य उपक्रम

# तपासणी शिबिरात महिला कर्मचाऱ्यांवर विशेष भर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची नियमित काळजी घेणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले यांनी केले. रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात आयोजित विशेष आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

रांजणगाव एमआयडीसी परिसरातील पोलिस कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा विचार करून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिरूरचे पोलिस निरीक्षक संदेश केंजळे तसेच रांजणगावचे पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे उपस्थित होते. या शिबिरात ७५ हून अधिक पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलचे डॉ. अनिकेत कुऱ्हाडे, डॉ. स्मिता वाघमोडे आणि डॉ. कस्तुरी कुऱ्हाडे यांनी रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार आदींची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. महिला पोलिस कर्मचाऱ्यांच्या आरोग्य समस्यांकडेही यावेळी विशेष लक्ष देण्यात आले. अनियमित कामाचा ताण, वेळेवर आहार न घेणे आणि सततची धावपळ यामुळे उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांबाबत डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे पोलिस दलात आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली असून, एकाच ठिकाणी तपासणीची सुविधा उपलब्ध झाल्याने कर्मचाऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## 'जलतारा' प्रकल्पावर मार्गदर्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी :** दुष्काळी भागात वर्षभर पाणी उपलब्ध राहावे आणि जलसंधारणाबाबत प्रभावी उपाययोजना राबवाव्यात या उद्देशाने लोणी येथे 'जलतारा' प्रबोधन कार्यशाळा उत्साहात पार पडली. ग्रामस्थ, ग्रामपंचायत आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. ३० एप्रिल) सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यशाळेत जलतारा प्रकल्पाचे जनक व संशोधक प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. दुष्काळी भागातील शेतीत बाराही महिने पाणी कसे उपलब्ध राहू शकते, पाण्याचे संवर्धन कशा पद्धतीने करावे, त्यासाठी किती खर्च अपेक्षित आहे आणि त्याचे प्रत्यक्ष फायदे काय आहेत याविषयी त्यांनी सोप्या भाषेत माहिती दिली. तसेच भूजल पातळी वाढल्यामुळे पिकांना नैसर्गिक खनिजयुक्त पाणी कसे मिळते आणि त्याचा मानवी आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम याविषयीही त्यांनी तांत्रिक माहिती मांडली.

कार्यशाळेसाठी लोणी परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सरपंच सावळेराम नाईक, उपसरपंच राजेंद्र वाळुंज पाटील, पोलीस पाटील संदीप आढाव, माजी सरपंच उद्धवराव लंके, माजी सरपंच दिलीप वाळुंज, शरद वाळुंज, सामाजिक कार्यकर्त्या नीलिमा वाळुंज, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष पडवळ, माजी उपसरपंच प्रकाश गायकवाड, सेवानिवृत्त मुख्याध्यापक जयवंत रोकडे, जनकल्याण पतसंस्थेचे संचालक प्रदीप कोचर, आंबेगाव तालुका दिव्यांग आघाडीचे अध्यक्ष प्रकाश शिनलकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी व नागरिक उपस्थित होते. माजी सरपंच उद्धवराव लंके यांनी आभार प्रदर्शन केले.

## लसूण, टोमॅटो, मिरचीची मोठी आवक; बाजारातील उलाढाल ५.८० कोटींवर

# चाकण बाजारात कांद्याच्या आवकेत घट; दरातही घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये रविवारी कांद्याच्या आवकेत घट झाल्याने दरातही घसरण सुरूच असल्याचे चित्र पाहायला मिळाले. दुसरीकडे लसूण, टोमॅटो, हिरवी मिरची, दोडका, गवार आणि भेंडी यांसारख्या फळभाज्यांची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. पालेभाज्यांची तुलनेने कमी आवक झाल्याने त्यांच्या दरात वाढ नोंदवली गेली. दिवसभरात बाजारातील एकूण उलाढाल सुमारे ५ कोटी ८० लाख रुपयांवर पोहोचली.

बाजारात कांद्याची एकूण आवक सुमारे ५ हजार क्विंटल झाली. कांद्याला प्रती क्विंटल कमाल १,३०० रुपये, सरासरी १,००० रुपये आणि किमान ७०० रुपये दर मिळाला. बटाट्याची आवक १,५०० क्विंटल नोंदली गेली असून त्याचा कमाल दर १,३०० रुपयांवर स्थिर राहिला. लसणाची आवक ५० क्विंटल झाली असून त्याला कमाल १२ हजार रुपये दर मिळाला.

हिरव्या मिरचीची आवक ३७० क्विंटल झाली असून तिला ३,५०० ते ४,००० रुपये दर मिळाला. फळभाज्यांच्या बाजारात टोमॅटो (२९२ क्विंटल) २,००० ते २,५०० रुपये, कोबी (१८० क्विंटल) ६०० ते ७०० रुपये, फ्लॉवर (१९५ क्विंटल) १,००० ते १,२०० रुपये, वांगी (७४ क्विंटल) २,००० ते २,५०० रुपये, भेंडी (८२ क्विंटल) २,००० ते ३,००० रुपये, दोडका (५४ क्विंटल) ३,००० ते ३,५०० रुपये, कारली (६४ क्विंटल) २,५०० ते ३,५०० रुपये असे दर नोंदवले गेले. याशिवाय दुधीभोपळा, काकडी, फरशी, वालवड, ढोबळी मिरची, चवळी, वाटाणा, शेवगा, गाजर, गवार आणि आले यांच्याही आवकेत वाढ झाली असून त्यांचे दरही चढे राहिले. ओली भुईमूग शेंग ४,५०० ते ५,००० रुपयांदरम्यान विकली गेली.

पालेभाज्यांमध्ये मेथीची ७,४९० जुड्या (१,५०० ते २,५०० रुपये), कोथिंबीर १९,९६५ जुड्या (१,००० ते २,५०० रुपये), शेपू ३,०५४ जुड्या (१,००० ते १,४०० रुपये) आणि पालक ३,६५१ जुड्या (६०० ते १,००० रुपये) अशी आवक नोंदली गेली. कमी आवकामुळे पालेभाज्यांचे दर तुलनेने वाढले.

दरम्यान, जनावरांच्या बाजारातही मोठी उलाढाल झाली. ४५ जर्सी गाईंपैकी ३२ गाईंची १५ हजार ते ७० हजार रुपयांदरम्यान विक्री झाली. ५५ बैलांपैकी ४२ बैलांची १० हजार ते ४० हजार रुपयांदरम्यान विक्री झाली. ८० म्हशींपैकी ६७ म्हशी ३० हजार ते ८० हजार रुपयांदरम्यान विकल्या गेल्या. तसेच ११,१०० शेळ्या-मेंढ्यांपैकी १०,७०० जनावरांची विक्री होऊन त्यांना २ हजार ते १५ हजार रुपये दर मिळाला.

## गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप; रोजगाराला प्रोत्साहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने डिसेंट फाउंडेशन, पुणे आणि हायस्पीड स्किल हब, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवणकला प्रशिक्षण समारोप व प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम गोळेगाव येथे उत्साहात पार पडला. या वेळी दोन आदिवासी महिलांना शिलाई मशीनचे वाटप करत, रोजगाराच्या दिशेने प्रोत्साहन देण्यात आले.

डिसेंट फाउंडेशनच्या वतीने साधना प्रीतम काळे आणि कुंदा अनिल जाधव यांना शिलाई मशीन देण्यात आले. ४० दिवसांच्या प्रशिक्षणात सहभागी महिलांना शिवणकलेचे सखोल मार्गदर्शन देण्यात आले असून, समारोपावेळी त्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे हा असल्याचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी सांगितले. कार्यक्रमाला जुन्नर पंचायत समितीच्या सभापती कमलताई शेळकंदे, जिल्हा परिषद सदस्या डॉ. छायाताई तांबे, सोनाबाई दाभाडे, पंचायत समिती सदस्या निलमताई आमले, हायस्पीड स्किल हबचे संस्थापक दिलीप भगत, डिसेंट फाउंडेशनचे सचिव डॉ. एफ. बी. आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, बेलसरच्या सरपंच नीता ताजने आदी उपस्थित होते.

## सारांश वृत्त

### केरळ मुख्यमंत्रिपदाची निवड काँग्रेस करणार

**तिरुवनंतपुरम:** काँग्रेस कमिटीच्या सरचिटणीस आणि केरळच्या प्रभारी दीपा दासमुन्शी यांनी रविवारी सांगितले की, यूडीएफ आघाडी सत्तेवर आली, तर मुख्यमंत्रीपदाच्या उमेदवाराचा निर्णय मित्रपक्षांनी काँग्रेसवर सोपवला आहे. केरळमध्ये ९ एप्रिल रोजी विधानसभा निवडणुका पार पडल्या असून, त्याचा निकाल ४ मे रोजी जाहीर होईल.

### उधमपूरमधील सुरक्षा सज्जतेचा आढावा

**जम्मू** : उधमपूर-रियासी परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक (डीआयजी) शिव कुमार शर्मा यांनी रविवारी एका कार्यवाही-सह-सुरक्षा आढावा बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवताना, प्रभावी गुप्तचर यंत्रणा विकास आणि सातत्यपूर्ण सामुदायिक सहभागाद्वारे गुप्तचर यंत्रणा अधिक मजबूत करण्याच्या गरजेवर भर दिला. उधमपूर जिल्ह्यातील माजलता पोलीस ठाण्यात झालेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले आणि ८४ ब्रिगेड रामपूर, माजलता व पोलीस चौकी खून यांच्या मुख्यालयांना भेट देऊन कारवाईच्या तयारीचा आढावा घेतला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. वाढीव दक्षता आणि कार्यान्वयन कार्यक्षमता राखण्यासाठी लांब पल्ल्याची गस्त, जवळच्या पल्ल्याची गस्त आणि वेढा व शोध मोहीम तीव्र करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

### नीट विद्यार्थ्याची आत्महत्या तणावातून

**कोटा (राजस्थान)** : येथील वसतिगृहाच्या इमारतीवरून पडून मृत्यू पावलेल्या उत्तराखंडच्या एका नीट इच्छुकाच्या मृत्यूची नोंद आत्महत्या म्हणून केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले. सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. उत्तराखंडमधील अल्मोरा येथील रहिवासी असलेला दीक्षित प्रसाद (२०) नैराश्यात होता आणि त्याला त्याच्या परीक्षांसंबंधी तणाव होता. रविवारी होणाऱ्या चाचण्यांच्या एक दिवस आधी, लँडमार्क सिटीमधील एका इमारतीच्या सहाव्या मजल्यावरून उडी मारल्याने त्याचा मृत्यू झाला.

## ईव्हीएम परिसरात टीएमसी-भाजप आमनेसामने

# भवानीपूरमध्ये मतमोजणीपूर्वी तणाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भवानीपूर मतदारसंघात मतमोजणीच्या एक दिवस आधी ईव्हीएम ठेवलेल्या परिसरात भाजपचे झेंडे लावलेल्या वाहनांना प्रवेश दिल्याचा आरोप झाल्याने तणाव निर्माण झाला आहे. तृणमूल काँग्रेस (टीएमसी) कार्यकर्त्यांनी या घटनेविरोधात आक्षेप घेतल्याने परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

सखावत मेमोरियल गर्ल्स स्कूल येथील मतमोजणी केंद्राबाहेर गुरुवारी रात्रीच ममता बॅनर्जी यांनी स्ट्रॉंगरूममध्ये अनधिकृत प्रवेश झाल्याचा आरोप करत सुमारे चार तास धरणे आंदोलन केले होते. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी वाहन प्रवेशाचा प्रकार घडल्याने राजकीय वातावरण अधिकच तापले.

रविवारी सकाळी मतमोजणी केंद्रापासून सुमारे १०० मीटर अंतरावर तळ ठोकून बसलेल्या टीएमसी कार्यकर्त्यांनी दावा केला की, भाजपचे झेंडे लावलेल्या दोन गाड्या आवारात घुसून स्ट्रॉंगरूमच्या दिशेने गेल्या. "वैध ओळखपत्राशिवाय कोणालाही प्रवेश दिला जात नाही, मग या वाहनांना परवानगी कशी मिळाली?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. विरोध केल्यानंतर केंद्रीय सुरक्षा दलांनी त्यांना मागे हटविल्याचा आरोपही करण्यात आला.

टीएमसीने असा दावा केला की, पोलिसांनी वाहन हटवण्याचे आश्वासन दिले होते; मात्र काही काळ ती वाहने तिथेच उभी होती. दुसरीकडे, निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी हे आरोप फेटाळून लावत संबंधित वाहन केवळ हरीश मुखर्जी रोडवरून जात होते आणि तपासणीनंतर त्यात काहीही संशयास्पद आढळले नसल्याने पुढे जाऊ देण्यात आल्याचे स्पष्ट केले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीनंतर सीलबंद ईव्हीएम ठेवलेल्या स्ट्रॉंगरूमच्या सुरक्षेबाबत टीएमसीकडून सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. टीएमसी नेते शशी पंजा आणि कुणाल घोष यांनी खुदीराम अनुशीलन केंद्राबाहेर धरणे आंदोलन करत स्ट्रॉंगरूममध्ये अनधिकृत हालचाली होत असल्याचा आरोप केला होता. हावडा येथेही स्ट्रॉंगरूमलगत सुरू असलेल्या कामांवर टीएमसीने आक्षेप घेतला, त्यानंतर निवडणूक आयोगाने ते काम तात्पुरते थांबवले. तसेच आसनसोल कॉलेज आणि बारासात शासकीय कॉलेज येथील स्ट्रॉंगरूमबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे काही काळ बंद असल्याचा आरोप करत आंदोलन करण्यात आले. मात्र, निवडणूक आयोगाने सर्व कॅमेरे सुरळीत कार्यरत असल्याचे सांगत हे आरोप फेटाळले आहेत.

दरम्यान, भाजपच्या प्रवक्त्या सजल घोष यांनी टीएमसीचे आरोप निराधार असल्याचे सांगत, "पराभवाची भीती वाटत असल्यानेच असे आरोप केले जात आहेत," अशी टीका केली. मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता पश्चिम बंगालमध्ये निकालापूर्वीच आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण रंगात आले असून, मतमोजणीपर्यंत तणाव कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## माध्यम स्वातंत्र्यावरून खर्गे यांची भाजपवर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी रविवारी पत्रकार स्वातंत्र्याच्या मुद्द्यावरून भाजप-आरएसएसवर जोरदार टीका केली. त्यांच्या धोरणांमुळे स्वतंत्र पत्रकारितेला शिक्षा मिळते आणि सत्ताधारी विचारसरणीला साथ देणाऱ्यांना प्रोत्साहन दिले जाते, असा आरोप त्यांनी केला.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनानिमित्त 'एक्स'वरील पोस्टमध्ये खर्गे म्हणाले की, २०१४ पासून भारताचा जागतिक पत्रकार स्वातंत्र्य निर्देशांकात सातत्याने घसरत जाऊन तो १५७ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. संघ परिवाराने वृत्तसंस्थांचा आवाज दाबण्यासाठी कायदेशीर तरतुदींचा वापर शस्त्र म्हणून केल्याचा आरोपही त्यांनी केला.

खर्गे यांनी म्हटले की, "स्वतंत्र पत्रकारिता ही सत्तेची बाजू मांडण्यासाठी किंवा अपयश झाकण्यासाठी नसून सत्तेला प्रश्न विचारण्यासाठी आणि जबाबदार धरण्यासाठी अस्तित्वात असते." प्रसारमाध्यमे ही सत्ता आणि जनता यांच्यातील लोकशाही संतुलन राखण्याचे कार्य करतात, असेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या मते, मानहानी कायदे, राष्ट्रीय सुरक्षेच्या तरतुदी आणि व्यापक फौजदारी कायद्यांचा वापर न्यायासाठी नव्हे तर दडपशाहीसाठी केला जात आहे. २०१४ ते २०२० या काळात १३५ हून अधिक पत्रकारांवर कारवाई झाली, तर २०१४ ते २०२३ दरम्यान ३६ पत्रकारांना तुरुंगात टाकण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. काही राज्यांमध्ये पत्रकारांवर हल्ले आणि हत्या झाल्याचा उल्लेख करत त्यांनी उत्तर प्रदेशातील राघवेंद्र बाजपेयी, छत्तीसगडमधील मुकेश चंद्रकर, उत्तराखंडमधील राजीव प्रताप सिंह आणि हरियाणातील धर्मेंद्र सिंह चौहान यांच्या घटनांचा संदर्भ दिला.

जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर सर्वांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सत्ताधाऱ्यांनी लोकशाही मूल्यांचे पालन करणे अत्यावश्यक असून, त्यापासून कोणतीही तडजोड दीर्घकालीन दुष्परिणाम घडवू शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

## सीबीआयची मोठी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चंदीगड :** केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ने संयुक्त अरब अमिरातीमधून दोन फरार आरोपींना भारतात प्रत्यार्पित करण्यात यश मिळवले आहे. यामध्ये आलोक कुमार उर्फ यशपाल सिंग आणि कमलेश पारेख यांचा समावेश आहे.

सीबीआयच्या माहितीनुसार, आलोक कुमार हा बनावट कागदपत्रांच्या आधारे लोकांना भारतीय पासपोर्ट मिळवून देणाऱ्या सुसंघटित रॅकेटचा प्रमुख सूत्रधार होता. हरियाणा पोलीस त्याचा फसवणूक, बनावटगिरी आणि गुन्हेगारी कट यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये शोध घेत होते. त्याच्याविरोधात इंटरपोल मार्फत रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली होती. त्यानंतर त्याला यूएईमध्ये अटक करण्यात आली. प्रत्यार्पण प्रक्रियेनंतर आलोक कुमार याला १ मे रोजी मुंबईत आणण्यात आले असून हरियाणा पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. दुसरा आरोपी कमलेश पारेख हा मोठ्या बँकिंग घोटाळ्याप्रकरणी हवा होता. स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या नेतृत्वाखालील बँकांच्या समूहाला तब्बल २,६७२ कोटी रुपयांचे नुकसान पोहोचवल्याचा त्याच्यावर आरोप आहे. २०१६ मध्ये कोलकाता येथे २५ बँकांची फसवणूक केल्याप्रकरणी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सीबीआयच्या तपासानुसार, पारेख आणि इतरांनी परदेशी कंपन्यांच्या माध्यमातून कर्ज निधी वळवून आर्थिक व्यवहारांमध्ये फेरफार केला. यूएईसह विविध देशांमध्ये कंपन्यांचे जाळे उभे करून निधीचा अपहार करण्यात आल्याचे उघड झाले. पारेख याला १ मे रोजी दिल्लीत आणण्यात आले असून सध्या तो सीबीआयच्या ताब्यात आहे.

या दोन्ही प्रत्यार्पणासाठी भारतीय यंत्रणा, परराष्ट्र मंत्रालय, गृह मंत्रालय तसेच यूएई प्रशासन यांच्यात घनिष्ठ समन्वय साधण्यात आला.

## नवीन आधारवर निर्बंधांसाठी याचिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारतीय नागरिक असल्याचे भासवून घुसखोरांकडून होणारा गैरवापर रोखण्यासाठी, विशिष्ट ओळख प्राधिकरणाला सहा वर्षांपर्यंतच्या मुलांनाच नवीन आधार कार्ड जारी करण्यावर निर्बंध घालण्याचे आणि किशोरवयीन व प्रौढांसाठी अधिक कठोर मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे निर्देश देण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालय सोमवारी सुनावणी घेणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या ४ मे रोजीच्या कामकाजाच्या यादीनुसार, या प्रकरणाची सुनावणी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर होईल.

वकील अश्विनी उपाध्याय यांनी अधिवक्ता अश्विनी दुबे यांच्यामार्फत दाखल केलेल्या जनहित याचिकेत, सार्वजनिक सेवा केंद्रांवर फलक लावून हे स्पष्ट करण्याचे निर्देश देण्याची मागणीही करण्यात आली आहे की, आधार हा केवळ ओळखीचा पुरावा आहे, नागरिकत्व, पत्ता किंवा जन्मतारखेचा पुरावा नाही. या याचिकेत यूआयडीएआय, केंद्रीय गृह, कायदा आणि न्याय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालये, तसेच सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांना पक्षकार म्हणून नाव देण्यात आले आहे. त्यात असा युक्तिवाद केला आहे की, मूळतः ओळखपत्र म्हणून असलेले आधार, आता शिधावाटप कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र आणि मतदार ओळखपत्र यांसारखी इतर ओळखपत्रे मिळवण्यासाठी एक 'पायाभूत दस्तऐवज' बनले आहे.

जवळपास ९९ टक्के लोकसंख्येला समाविष्ट करणारे १४४ कोटींहून अधिक आधार क्रमांक जारी करण्यात आले आहेत, याचा हवाला देत याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, कमकुवत पडताळणी प्रक्रियांमुळे घुसखोरांना "भारतीय नागरिक" या प्रवर्गाखाली खोटा अर्ज करून आधार मिळवण्याची संधी मिळते. त्यात असा दावा केला आहे की, अशा व्यक्ती नंतर इतर कागदपत्रे मिळवतात, ज्यामुळे त्यांना नागरिकांपासून वेगळे ओळखता येत नाही, आणि या गैरवापरामुळे लक्ष्यित कल्याणकारी योजनांच्या वितरणात अडथळा येतो व सार्वजनिक संसाधनांचे वळण लागते, अशी चिंता व्यक्त केली आहे.

या याचिकेत असाही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे की, नागरिक आणि परदेशी नागरिक यांच्यात पुरेसा भेद करण्यात अयशस्वी ठरल्यामुळे आधार कायदा, २०१६ हा "कालानुरूप अवाजवी" झाला आहे का.

## घव चड्ढा यांनी घेतली राष्ट्रपती यांच्याकडे धाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** खासदार राघव चड्ढा यांनी आम आदमी पार्टी (आप) सोडल्यानंतर आता आपल्या माजी पक्षासह पंजाब सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी द्रौपदी मुर्मू यांची भेट घेण्यासाठी वेळ मागितला असून राष्ट्रपती भवनाने ती मंजूर केली आहे. ही महत्त्वाची बैठक ५ मे रोजी सकाळी १०.४० वाजता होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

या बैठकीत चड्ढा यांच्यासोबत 'आप'मधून बाहेर पडून भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केलेले इतर खासदारही उपस्थित राहणार आहेत. पंजाबमधील भगवंत मान सरकारकडून कथित सूडाच्या राजकारणाचा अवलंब केला जात असल्याचा आरोप हे शिष्टमंडळ राष्ट्रपतींसमोर मांडणार आहे.

या खासदारांचा आरोप आहे की, 'आप' सोडून भाजपमध्ये गेलेल्या नेत्यांना राज्य सरकारकडून जाणीवपूर्वक लक्ष्य केले जात असून शासकीय यंत्रणेचा गैरवापर केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींच्या हस्तक्षेपाची मागणी केली जाणार आहे.

दरम्यान, २४ एप्रिल २०२६ रोजी राघव चड्ढा यांच्यासह 'आप'च्या सात राज्यसभा खासदारांनी पक्षत्याग करून भाजपमध्ये प्रवेश केला. या निर्णयामुळे पंजाबमधील राजकीय घडामोडींना वेग आला असून 'आप'ने या खासदारांचे सदस्यत्व रद्द करण्याची मागणी केली आहे. चड्ढा यांच्यासोबत पक्ष सोडणाऱ्यांमध्ये संदीप पाठक, अशोक कुमार मित्तल, हरभजन सिंग, राजिंदर गुप्ता, विक्रमजीत सिंग साहनी आणि स्वाती मालीवाल यांचा समावेश आहे.

दरम्यान, पंजाब पोलिसांनी संदीप पाठक यांच्याविरोधात अजामीनपात्र कलमांखाली दोन गुन्हे दाखल केल्याची माहिती समोर आली आहे.

## बागलीहार धरणाचे दरवाजे बंदच

# पाकच्या जलव्यवस्थापनावर परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील रामबन जिल्ह्यात चिनाब नदीवरील बागलीहार धरण प्रकल्पाचे सर्व दरवाजे अद्याप पूर्णपणे बंद ठेवण्यात आले आहेत. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू पाणी तह स्थगित केल्याला आता एक वर्ष पूर्ण झाले असून केंद्र सरकारची भूमिका याबाबत कायम आहे.

या तहाच्या स्थगितीनंतर पाकिस्तानकडे जाणारा पाण्याचा प्रवाह नियंत्रित करण्यासाठी आणि राजनैतिक दबाव निर्माण करण्याच्या उद्देशाने बागलीहार धरणाचे मुख्य दरवाजे बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयामुळे चिनाब नदीवरील जलव्यवस्थापन आणि जलविद्युत प्रकल्पांच्या कार्यावर दीर्घकालीन परिणाम होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

दरम्यान, अलीकडे रामबन परिसरात झालेल्या मुसळधार पावसामुळे चिनाब नदीची पातळी धोक्याच्या स्तराजवळ पोहोचली होती. धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही काळासाठी दरवाजे उघडण्यात आले होते; मात्र परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर ते पुन्हा बंद करण्यात आले. १९६० साली भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या सिंधू पाणी तहानुसार सहा प्रमुख नद्यांच्या पाण्याचे वाटप निश्चित करण्यात आले आहे. या जलप्रणालीमध्ये सिंधू नदी, झेलम नदी, चिनाब नदी, रावी नदी, बियास नदी आणि सतलज नदी यांचा समावेश आहे.

पूर्वेकडील नद्या (भारताचा पूर्ण हक्क) : रावी, बियास आणि सतलज, पश्चिमेकडील नद्या (मुख्यत्वे पाकिस्तान, मर्यादित भारत) : सिंधू, झेलम आणि चिनाब

या तहानुसार भारताला पश्चिमेकडील नद्यांवर 'रन-ऑफ-द-रिव्हर' प्रकारातील जलविद्युत प्रकल्प उभारण्याची परवानगी आहे. पूर्वेकडील नद्यांवरील पाण्याचा उपयोग करण्यासाठी भारताने अनेक मोठे प्रकल्प उभारले आहेत, त्यात भाक्रा धरण, पाँग धरण, पांडोह धरण, रणजित सागर धरण यांचा समावेश आहे.

सिंधू पाणी तह स्थगितीनंतर बागलीहार धरणावरील नियंत्रणात्मक उपाययोजनांमुळे भारत-पाकिस्तान संबंधांतील तणावासह जलव्यवस्थापनाच्या समीकरणांमध्येही लक्षणीय बदल दिसून येत आहेत.

## पश्चिम बंगाल निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक २०२६ मध्ये सत्ताधारी ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आणि भारतीय जनता पार्टी (भाजप) यांच्यात थेट आणि चुरशीची लढत रंगली आहे. दोन टप्प्यांत पार पडलेल्या मतदानानंतर आता निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

निवडणुकीत यंदा विशेष सघन सुधारणा (एसआयआर) प्रक्रियेमुळे मतदार यादीतून सुमारे ९० लाख नावे वगळण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला. निवडणूक आयोगाने ही कारवाई बनावट व निष्क्रिय मतदार वगळण्यासाठी असल्याचे स्पष्ट केले, तर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी हा भाजपचा राजकीय डाव असल्याचा आरोप केला आहे. या निर्णयाचा परिणाम मालदा, मुर्शिदाबाद तसेच उत्तर व दक्षिण २४ परगणा जिल्ह्यांमध्ये प्रकर्षाने जाणवला.

मतदारसंख्या कमी असूनही मतदानाचा टक्का विक्रमी राहिला. पहिल्या टप्प्यात सुमारे ९३ टक्के, तर दुसऱ्या टप्प्यात ९० टक्क्यांपर्यंत मतदान झाले. तज्ज्ञांच्या मते, मतदारसंख्या घटल्याने मतदानाची टक्केवारी वाढलेली दिसत आहे. राज्यातील राजकारण उत्तर आणि दक्षिण बंगालमध्ये विभागले गेले आहे. उत्तर बंगालमध्ये भाजपची पकड मजबूत असताना, दक्षिण बंगालमध्ये टीएमसीचे वर्चस्व कायम आहे. मात्र, भाजपने दक्षिण बंगालमध्येही आक्रमक प्रचार मोहीम राबवून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे.

नादिया आणि उत्तर २४ परगणा भागातील मातुआ समाज यंदा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या मुद्द्यावर भाजपने या समाजाला आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे टीएमसीवर दबाव वाढला असून, केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईचा मुद्दाही निवडणुकीत गाजला. भाजपने या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतली आहे. एक्झिट पोलमध्ये स्पष्ट चित्र दिसत नसून, काही सर्वेक्षणे भाजपला आघाडी देत आहेत, तर काहींमध्ये टीएमसी पुढे असल्याचे दिसते. परिणामी, त्रिशंकू विधानसभा निर्माण होण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

## यापूर्वीच्या सरकारांमुळे उत्तर प्रदेश बिमारू

**लखनौ :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी रविवारी राज्याला 'बिमारू' बनवण्यासाठी मागील सरकारांच्या काळातील भ्रष्टाचाराला जबाबदार धरले आणि सांगितले की, तत्कालीन निवड प्रक्रियेतील भेदभावामुळे न्यायालयांना हस्तक्षेप करण्यास भाग पडले, असे त्यांनी एका कार्यक्रमात बोलताना सांगितले. याप्रसंगी, नव्याने निवड झालेल्या ३५७ कनिष्ठ विश्लेषक आणि वैद्यकीय व आरोग्य विभागासाठी २५२ दंत आरोग्य तज्ज्ञांना पत्रे वितरित करण्यात आली.

## विवेक विहारमध्ये भीषण आग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** शाहदरा येथील विवेक विहार परिसरातील एका निवासी इमारतीला रविवारी पहाटे लागलेल्या भीषण आगीत नऊ जणांचा होरपळून मृत्यू झाला. मृतांमध्ये चार महिला, चार पुरुष आणि एका वर्षाच्या बालकाचा समावेश आहे.

अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी पोहोचून विविध मजल्यांवरून मृतदेह बाहेर काढले. त्यामध्ये पहिल्या मजल्यावरून एक, दुसऱ्या मजल्यावरून पाच, तर कुलूपबंद जिन्यातून तीन मृतदेह आढळून आले.

अग्निशमन विभागाला पहाटे ३.४७ वाजता आगीची माहिती मिळाली. त्यानंतर तातडीने १४ अग्निशमन गाड्या घटनास्थळी पाठविण्यात आल्या. सुमारे दोन तासांच्या प्रयत्नांनंतर सकाळी ६.२५ वाजता आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले. या दरम्यान इमारतीतील १० ते १५ रहिवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले.

प्राथमिक तपासानुसार, एअर कंडिशनरच्या स्फोटामुळे आग लागल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या घटनेत किरकोळ जखमी झालेल्या दोघांना उपचारासाठी गुरु तेग बहादूर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पोलीस उपआयुक्त आर. पी. मीना यांनी दिलेल्या माहितीनुसार, इमारतीतील दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या मजल्यावरील फ्लॅट्सना आग लागली होती. घटनास्थळी पोलिस, अग्निशमन दल आणि गुन्हे अन्वेषण पथकाकडून पुढील तपास सुरू आहे.

## आशिया-पॅसिफिकमध्ये केला प्रवेश; सागरी तणाव तीव्र

# इराणी टँकरने नाकेबंदीने अमेरिकन नाकेबंदी चुकवली

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेहरान :** पश्चिम आशियातील वाढत्या सागरी तणावाच्या पार्श्वभूमीवर, नॅशनल इराणी टँकर कंपनीच्या व्हेरी लार्ज क्रूड कॅरियर सुपरटँकरने अमेरिकन नौदलाच्या नाकेबंदीला चुकवत आशिया-पॅसिफिक क्षेत्रात प्रवेश केल्याचा दावा समोर आला आहे. या जहाजावर सुमारे १.९ दशलक्ष बॅरल कच्चे तेल असून त्याची किंमत अंदाजे २२० दशलक्ष अमेरिकी डॉलर्स इतकी असल्याचे सांगितले जात आहे.

सदर टँकर सध्या लोम्बोक सामुद्रधुनी मार्गे रियाऊ द्वीपसमूह दिशेने जात असल्याची माहिती निरीक्षण संस्थांकडून देण्यात आली आहे. हे जहाज आठवडाभरापूर्वी श्रीलंका किनाऱ्याजवळ दिसले होते.

टँकरट्रॅकर्स डॉट कॉम या संस्थेनुसार, 'ह्यूज' नावाच्या या जहाजाने २० मार्चपासून ऑटोमॅटिक आयडेंटिफिकेशन सिस्टम सिग्नल बंद ठेवले होते. त्यामुळे त्याच्या हालचाली गुप्त ठेवण्याचा प्रयत्न झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. इराणच्या सरकारी माध्यमांनीही २९ एप्रिल रोजी किमान ५२ जहाजांनी अमेरिकन नाकेबंदी भेदल्याचा दावा केला होता.

दरम्यान, अल जझीराच्या वृत्तानुसार, अमेरिकन अधिकाऱ्यांनी ही नाकेबंदी प्रभावी असल्याचा दावा करत, त्यामुळे तेहरानच्या तेल महसुलावर मोठा परिणाम झाल्याचे म्हटले आहे. वॉशिंग्टनच्या मते, इराणची निर्यात क्षमता मर्यादित झाली असून उत्पादनावर दबाव वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर युनायटेड स्टेट्स सेंट्रल कमांडनेही अरबी समुद्रात कारवाया सुरू असल्याची पुष्टी केली आहे. यूएसएस न्यू ऑर्लिन्स हे युद्धनौकाही नाकेबंदी अंमलात आणण्यासाठी तैनात असल्याचे सांगण्यात आले. मागील २० दिवसांत ४८ जहाजांना वळवण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

अमेरिकेने स्पष्ट केले आहे की ही नाकेबंदी होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे बंद करण्यासाठी नसून, ती विशेषतः इराणी बंदरे आणि किनारपट्टीवर लक्ष केंद्रित करून राबवली जात आहे. तथापि, या भागातील जहाजवाहतुकीवर त्याचा परिणाम होत असल्याचे दिसत आहे.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणकडून आलेल्या नव्या प्रस्तावाचा आढावा घेत असल्याचे सांगितले, मात्र करार होण्याबाबत त्यांनी साशंकता व्यक्त केली. इराणकडून १४ कलमी प्रस्ताव पाकिस्तानमार्गे पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली असली, तरी त्याबाबत अधिकृत तपशील अद्याप स्पष्ट झालेला नाही.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, पश्चिम आशियातील सागरी तणाव कायम असून राजनैतिक हालचालीही सुरू आहेत. जागतिक तेलपुरवठ्यासाठी महत्त्वाचा मानला जाणारा होर्मुझची सामुद्रधुनी मार्ग खुला ठेवण्याबाबतही चर्चा सुरू असून, या प्रदेशातील परिस्थितीवर जगभराचे लक्ष लागले आहे.